दिनांक : ६/४/२०१८

**जळगांव जिल्हा पोलीस भरती-२०१८.**

**प्रेसनोट**

जळगांव जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर दिंनाक १२/३/२०१८ पासुन खुल्या प्रवर्गातील ११२ जागांसाठी पोलीस शिपाई भरती प्रक्रिया राबविण्यांत येत आहे.

दिंनाक ६/४/२०१८ रोजी भरती प्रक्रियेत पोलीस कवायत मैदान, जळगांव येथे ६९५ महिला उमेदवार यांना बोलाविण्यांत आले होते, त्यापैकी ४८८ महिला उमेदवार हजर होत्या आणि २०७ उमेदवार गैरहजर राहीलेले आहेत, तसेच दि.०४/०४/२०१८ व ०५/०४/२०१८ रोजी गैरहजर राहिलेल्या उमेदवारांपैकी ३० महिला उमेदवार देखील हजर होत्या, अशा एकूण ५१८ महिला उमेदवार पोलीस कवायत मैदान, जळगांव येथे हजर होत्या. हजर महिला उमेदवारापैकी ४५३ उमेदवार शाररीक मोजमापात पात्र ठरले, असून ६५ महिला उमेदवार उंची मोजमापात अपात्र ठरल्या आहेत.

शारिरीक मोजमाप चाचणीत पात्र ४५३ महिला उमेदवारांची १०० मीटर धावणे, लांबऊडी, गोळाफेक, या मैदानी चाचण्या आज पुर्ण करण्यांत आल्या आहेत. सदर उमेदवारांची ८०० मिटर धावणे चाचणी दि. ७/४/२०१८ रोजी सकाळी ०५.०० वाजता घेण्यांत येणार आहे. सदर उमेदवारांनी चाचणी साठी येतांना त्यांना दिलेले गुलाबी रंगाचे चेस्ट क्रंमाक कार्ड सोबत आणावे, तसेच ओळख पटविण्यासाठी आवश्यक कागदपत्र सोबत आणावेत.

दिनांक ०५/०४/२०१८ रोजी तीन मैदानी चाचण्या पुर्ण केलेल्या ५४५ महिला उमेदवारांपैकी ३५७ महिला उमेदवार दिंनाक ६/४/२०१८ रोजी ८०० मीटर धावण्यांची मैदानी चाचणीसाठी उपस्थित होत्या. सदरहू ३५७ उमेदवारांची ८०० मीटर धावण्याची मैदानी चाचणी दिंनाक ०६/४/२०१८ रोजी सकाळी ०५.०० वाजता घेण्यांत आली असून ०९.३० वाजता पुर्ण करण्यांत आली आहे.

दि.१२/०३/२०१८ ते २८/०३/२०१८ या कालावधीत भरती प्रक्रियेस उपस्थित राहू न शकलेले उमेदवार हे मैदानी चाचणीसाठी प्रवेशपत्र, आवेदन अर्ज, अलीकडील काळातील पासपोर्ट साईज फोटो (६ नग) आणि उमेदवारांची ओळख पटविण्यासाठी आवश्यक असलेले आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, वाहन परवाना, महाविद्यालयाचे ओळखपत्र इत्यादि मुळ कागदपत्र व त्यांची एक झेरॉक्स प्रत घेऊन दि.०७/४/२०१८ रोजी सकाळी ०४:०० वाजता उपस्थित राहील्यास त्यांची शारिरीक चाचणी/मैदानी चाचणी घेण्यात येणार आहे.

**(दत्तात्रय कराळे )**
**पोलीस अधिक्षक, जळगांव.**

**प्रति,**

**पोलीस निरिक्षक जिविशा जळगांव.**

२/- सदरची प्रेसनोट स्थानिक वृतपत्रात विनामुल्य प्रसिध्द करण्यांची विनंती करण्यांत यावी.

**प्रत माहीतीसाठी व जरुर त्या कार्यवाहीसाठी:-**

पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय), जळगांव/ नि.कक्ष अधिकारी, जळगांव/
रापोनि,पो.मु.जळगांव/स्टेनो- १ / २, / पो. नि. स्था.गु.शा जळगांव.